Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# महाराष्ट्रातील महिलांची राजकीय स्थिती (1962 ते 2024)

**निलेश देवराव परमुरे**
संशोधक विद्यार्थी
श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
राजुरा, जिल्हा-चंद्रपूर
Email ID- neel220par@gmail.com
Mob. No. 9730667166

**डॉ. नितीन तु. कत्रोजवार**
मार्गदर्शक
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमुर, जिल्हा-चंद्रपूर

---

**सारांश :**

*भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षाचा काळ लोटला स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण मोठ्या आनंदाने साजरा केला परंतु या 75 वर्षाच्या कालावधीत देशाच्या राजकीय कार्य कुशलतेत, देशाच्या विकासात महिलांना बरोबरीचे स्थान दिले गेले का हा प्रश्न सतत उपस्थित राहतो. सर्व मानव जन्मताच समान प्रतिष्ठेचे आणि समान अधिकाराचे आहे आणि प्रत्येकाला वंश, रंग, लिंग, भाषा, धर्म जन्मस्थान किंवा इतर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्व हक्क आणि स्वातंत्र्याचा अधिकार आहे. जगातील जवळजवळ सर्वच देशात महिलांना समाजात दुय्यम स्थान मिळाले आहे हे एक न बसणारे सत्य आहे. सर्व प्रकारच्या सत्तेच्या पदावरून त्यांना स्वातंत्र्यपूर्व काळापासून तर आजपर्यंत भारतातील नेत्यांनी केंद्र आणि राज्य विधिमंडळातील, कायदेमंडळातील प्रतिनिधित्व बद्दल फक्त आणि फक्त तोंडी आश्वासन दिले त्यांना प्रतिनिधित्व न देता त्यांचा वोट बँक म्हणून उपयोग केला त्यामुळे महिला केंद्र व राज्य विधिमंडळात आपले प्रतिनिधित्व वाढू शकले नाही.*

*भारतीय संविधानात प्रौढ मताधिकाऱ्याची हमी दिली आहे स्त्री आणि पुरुष यांना निवडणूक लढवण्याची समान संधी दिली आहे तरीसुद्धा पुरुषाच्या वर्चस्वामुळे भारतीय राजकारणात महिला आपले स्थान मजबूत करू शकली नाही आणि ती लोकसभेपासून तर स्थानिक स्वराज्य संस्थेपर्यंत स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही आपल्याला मागे दिसून येते. काही प्रमाणात 73 व्या व 74 व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण दिल्या गेले व महाराष्ट्रामध्ये 2011 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षणाची व्यवस्था केली गेली त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये आज 50 टक्के महिला पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आपली कामगिरी बजावताना दिसत आहे. महाराष्ट्रातील राज्य विधिमंडळात महिलांचा सहभाग कसा आहे याची माहिती या पेपरंद्वारे घेण्यात येत आहे.*

**मुख्य शब्द :** अधिकार, लिंग,आरक्षण, विधिमंडळ, प्रतिनिधित्व वोट बँक

---

**प्रस्तावना :**

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताचा गौरव करण्यात येतो लोकशाहीचे प्रमुख लक्षण म्हणजे स्त्री पुरुष समानता होय राज्यघटनेने स्त्री आणि पुरुषांना समान दर्जा दिला असला तरी भारतात पुरुषप्रधान

संस्कृतीमुळे महिलांना अजूनही समान संधी मिळाली नाही असेच चित्र दिसून येते देशाची अर्धी लोकसंख्या असून सुद्धा स्त्री निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ शकत नाही ही शोकांतिका आहे.

निसर्गाने स्त्री-पुरुषांना बुद्धी कौशल्य समान दिले असले तरी प्राचीन काळापासूनच स्त्रियांना दुय्यम दर्जा देण्यात आला आहे त्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव जाणीवपूर्वक होऊ दिली नाही महिलांना चूल आणि मूल यातच गुंतून ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला स्वातंत्र्यानंतर मात्र राज्यघटनेने स्त्री पुरुष समानतेचे जे तत्व सांगितले त्यामुळे महिलांमध्ये अधिकाऱ्याच्या बाबतीत जाणीव जागृती झाली आणि महिला आपल्या अधिकारासाठी लढू लागल्या परंतु त्याचा फायदा महिला घेऊ शकल्या नाही कारण देशात राजकीय सामाजिक आर्थिक सांस्कृतिक शैक्षणिक आरोग्य या सर्व क्षेत्रांमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार हा राजकीय पुरुष मंडळींनाच होता आणि पुढची वर्चस्व असलेल्या समाजाने महिलांना समोर जाऊ दिले नाही प्रत्येक क्षेत्रात त्यांची गळचेपी केली म्हणून भारतीय राजकीय प्रक्रियेत महिलांचा प्रवास कसा आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. लोकशाही राजकीय व्यवस्थेत स्त्रियांच्या सहभागाचे स्वरूप काय आहे हे पाहणे.
2. भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेत महिलांचे स्थान व दर्जा काय आहे याचे अध्ययन करणे.
3. महिला प्रतिनिधी आपल्या अधिकार व कर्तव्याबाबत किती प्रमाणात जागृत आहे याचा शोध घेणे.

**गृहीतके** :

1. राजकारणात पुरुषाच्या तुलनेत महिला प्रतिनिधी कमी पडतात.
2. महिलांमध्ये पूर्ण प्रमाणात राजकीय जागृती झालेली नाही.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे तसेच या संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करून त्यात ग्रंथ, पुस्तके, शोधनिबंध, नियतकालिके यांचा उपयोग करण्यात आला आहे.

**राज्यस्तरिय राजकारणात महिलांचा सहभाग :**

संयुक्त महाराष्ट्राचे राजकारण 1960 मध्ये सुरू झाले विधानसभा पातळीरील राजकीय सहभागाच्या संदर्भात महिला या सामाजिक घटकाला वगळण्याची प्रक्रिया संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मीतीनंतर झालेल्या 1962 ते 2024 या चौदा निवडणूकांमध्ये घडली आहे. महिला पुरूष अशा विषमतेच्या परिणाम आहे. राजकीय बहिष्कार किंवा वगळण्याची प्रक्रिया खुप जटील आहे. लिंगभेदाप्रमाणेच जात व वर्ग या दोन घटकांचा परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर झालेला आहे. राजकीय क्षेत्रात 3972 उमेदवारांपैकी फक्त 210 महिला 1962 ते 2024 या चौदा निवडणूकांमध्ये निवडून येतात. म्हणजेच राजकीय क्षेत्रात महिलांचा अभाव दिसुन येतो. राज्यस्तरीय विधानसभा निवडणूकीत निवडून येण्याचा राजकीय हक्क आणि संधीची समानता महिलांना

नाकारण्यात आली असेच दिसन येते. राजकीय प्रतिनिधीत्वाच्या पुरूष आणि महिला यांच्यातील समान वितरणाचे तत्व पाळण्यात आले नाही. हे खालील तत्क्यावरून दिसुन येते.

**तक्ता क्रमांक 1.1**

**महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचे महिला पुरुष निहाय वर्गीकरण**

**(1962 ते 2024)**

| अ- क्र- | निवडणूक वर्ष | महिला सदस्य | पुरुष सदस्य | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 1962 | 13 | 251 | 264 |
| 2 | 1967 | 09 | 261 | 270 |
| 3 | 1972 | 28 | 242 | 270 |
| 4 | 1978 | 08 | 280 | 288 |
| 5 | 1980 | 19 | 269 | 288 |
| 6 | 1985 | 16 | 272 | 288 |
| 7 | 1990 | 06 | 282 | 288 |
| 8 | 1995 | 11 | 277 | 288 |
| 9 | 1999 | 12 | 276 | 288 |
| 10 | 2004 | 12 | 276 | 288 |
| 11 | 2009 | 11 | 277 | 288 |
| 12 | 2014 | 20 | 268 | 288 |
| 13 | 2019 | 24 | 264 | 288 |
| 14 | 2024 | 21 | 267 | 288 |
| | एकूण | 210 | 3762 | 3972 |

स्रोत :- विधानसभा निवडणूक 1962 ते 2024

वरील तक्त्यावरून दिसुन येते की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून म्हणजेच 1962 पासुन 2024 पर्यंत चौदा सार्वत्रिक निवडणूका झाल्यात त्या सर्व निवडणूकांमध्ये महिलांचे प्रमाण फारच कमी आहे. या सर्वांवर लक्ष देता विधानसभेमध्ये 3972 आमदार निवडून आले या आमदारांमध्ये 3762 पुरूष तर 210 महिला आमदार निवडून आल्या. म्हणजेच 96.23 टक्के पुरूष व 3.76 टक्के महिला आमदार निवडून आल्या होत्या. महिलांचे विधानसभेमध्येप्रमाण फार कमी आहे. 1962 च्या निवडणूकीत 13, 1972 मध्ये 28 महिला, 1978 मध्ये 08 महिला निवडून आल्या. 1980 मध्ये 19 महिला, 1985 मध्ये पुन्हा महिलांचे प्रमाण घटले व फक्त 06 महिला निवडून आल्या, 1995 मध्ये 11 महिला आमदार झाल्या. 1999 ते 2004 या नवव्या व दहाव्या सार्वजनिक निवडणूकीत अनुक्रमे 12 महिला निवडून आल्या आणि 2009 च्या अकराव्या सार्वत्रिक निवडणूकीत 288 जागांपैकी 11 महिला निवडून आल्या, 2014, 2019, 2024 मध्ये अनुक्रमे 20, 24, 21 अशा महिला प्रतिनिधी विधानसभेत निवडून आल्या. म्हणजेच 1962 ते 2009 च्या सर्व चौदा निवडणूकांमध्ये 1972 च्या

निवडणूकीतच 28 महिला निवडुन आले व त्याचे प्रमाण 10.28 टक्के होते. यावरून दिसुन येते की, महाराष्ट्रासारख्या प्रगत व पुरोगामी राज्यात महिलांचा विधानसभेतील सहभाग कमी होत आहे. हे खालील तक्त्यावरून दिसून येते

**तक्ता क्रमांक 1.2.**

**महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचे महिला पुरुष निहाय टक्केवारी.**

**संदर्भ वर्ष 1962 ते 2024**

| अ - क्र | निवडणूक वर्ष | महिला सदस्या टक्केवारी | पुरुष सदस्या टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 1962 | 4.92 | 95.7 |
| 2 | 1967 | 3.33 | 96.66 |
| 3 | 1972 | 10.28 | 89.72 |
| 4 | 1978 | 2-77 | 97.22 |
| 5 | 1980 | 6.59 | 93.40 |
| 6 | 1985 | 5.55 | 94.44 |
| 7 | 1990 | 2.08 | 97.91 |
| 8 | 1995 | 3.81 | 96.18 |
| 9 | 1999 | 4.16 | 95.83 |
| 10 | 2004 | 4.16 | 95.83 |
| 11 | 2009 | 3.81 | 96.18 |
| 12 | 2014 | 14.4 | 85.6 |
| 13 | 2019 | 12.02 | 87.98 |
| 14 | 2024 | 13.71 | 86.29 |

स्त्रोत : विधानसभा निवडणूक 1962 ते 2024

1962 ते 2024 या कालखंडात सर्व निवडणूकांमध्ये महिला निवडून येण्याची टक्केवारी पुरूषांच्या तुलनेत फार कमी आहे. चौदाही निवडणूकांमध्ये 10 टक्क्यांच्या वर महिलांचे प्रमाण वाढलेले दिसुन येत नाही. याचे कारण म्हणजे मतदार संघातील उमेदवार व पक्षातील अधिकार पदावर महिलांना जागा मिळावी अशी घोषणा जरी सर्वच राजकीय पक्ष देत असले तरी कोणत्याही राजकीय पक्षाने प्रत्यक्षात मोठया प्रमाणावर महिलांना उमेदवारी दिली नाही. 1984 च्या निवडणूकीत कॉग्रेसने 20 टक्के जागांवर महिलांना उमेदवारी देऊ असे आश्वासन दिले. प्रत्यक्षात मात्र 7.3 टक्के उमेदवारी महिलांना दिली. तसेच सी. पी. आय., सी. पी. आय(एम) यांनी प्रत्येकी दोन उमेदवार उभे केले.

**1962 ते 2024 पर्यंत महिला उमेदवारांची संख्या व विजय महिलांची संख्या :**

1962 मध्ये 36 महिलांनी निवडणूक लढवली होती त्यातील 13 महिला विजयी झाल्या, 1967 मध्ये

19 महिलांनी निवडणूक त्यातील 09 महिला विजयी झाल्या, 1972 मध्ये 56 महिलांनी निवडणूक लढवली त्यातील 26 महिला विजयी झाल्या, 1978 मध्ये 51 महिलांनी निवडणूक लढवल्या परंतु 08 महिला विजयी झाल्या, 1980 मध्ये 47 महिलांनी निवडणूक लढवली होती त्यातील 19 महिला विजयी झाल्या, 1985 मध्ये 13 महिलांनी निवडणूक लढवली व त्यातील 16 महिला विजयी झाल्या, 1990 मध्ये 147 महिलांनी निवडणूक लढवली होती त्यातील केवळ 07 महिला विजयी झाल्या, 1995 मध्ये 247 महिलांनी निवडणूक लढवली होती त्यातील केवळ 11 महिला विजयी झाल्या, 1999 मध्ये 86 महिलांनी निवडणूक लढवली त्यातील 12 महिला विजयी झाल्या, 2004 मध्ये 157 महिलांनी निवडणूक लढवली होती त्यातील 12 महिला विजयी झाल्या, 2009 मध्ये 211 महिलांनी निवडणूक लढवली होती त्यातील 11 महिलाविजयी झाल्या, 2014 मध्ये 277 महिलांनी निवडणूक लढवली होती त्यातील फक्त 20 महिला विजयी झाल्या, 2019 मध्ये 239 महिलांनी निवडणूक लढवली होती त्यातील 24 महिला विजयी झाल्या, 2024 मध्ये 21 महिला विजयी झाल्या.

वरील माहितीवरून असे लक्षात येते की महाराष्ट्र महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुका सुरू झाल्यापासून म्हणजेच 1962 ते 2024 पर्यंत किती महिलांनी प्रत्यक्षात निवडणूक त्यातील किती महिला विजय झाल्या त्याची माहिती आपल्याला दिसून आली आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मीतीनंतर महाराष्ट्रात पहिली निवडणूक 1962 ला झाली व त्या निवडणूकीत कॉंग्रेसला भरघोस विजय मिळाला आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे 1960-62 मध्ये मुख्यमंत्री बनले. त्यानंतरही अनेक निवडणूका झाल्या. परंतु महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री  पदी नाही 1962 ते 2024 या चौदा विधानसभा निवडणुकांमध्ये महिलांनी सहभागी झाला काही महिला निवडून पण आले पण त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होता आले नाही याला जबाबदार म्हणजे महाराष्ट्रातील पुरुषीवर्चस्व कारणीभूत आहे नाहीतर महिला आज पंतप्रधान झाल्या, राष्ट्रपती झाल्या, परंतु परोगामी व विकसित अशा या महाराष्ट्रात मात्र स्त्रिया मुख्यमुत्री होऊ शकल्या नाही. ही राज्याच्या दृष्टिने महिलांकरिता शोकांतिकाच म्हणावी लागेल.

**निष्कर्ष :**

लोकशाही राजकीय व्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढविण्याकरिता महिलांकरिता काही विशेष योजना आखण्याची गरज आहे महिला देशाच्या विकासात आपली भूमिका प्रकरपणे मांडू शकेल व आपल्या प्रतिनिधित्वाच्या बळावर या आपल्या क्षेत्रातल्या समस्या समजावून घेऊन सोडविण्याचा प्रयत्न करेल महिलांना राज्य विधिमंडळात महिलांना आरक्षण देऊन भागणार नाही. सध्या आरक्षणाचा फायदा त्या कशा घेईल याकडे राजकीय पुढाऱ्यांनी लक्ष द्यायला पाहिजे स्त्रियांना चूल आणि मुल या बंधनातून बाहेर काढून सरळ हाताने जर राजकीय पुढाऱ्यांनी महिलांना आश्वासन न देता त्यांना प्रतिनिधित्व दिले तर त्या निवडणुकीत उभे राहून निवडून पण येईल. महिलांचे सबलीकरण करण्यासाठी महिलांमध्ये राजकीय जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी त्यांना राजकीय शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे त्यामुळे महिलांना जर राष्ट्रीय शिक्षण मिळाले तर त्या खऱ्या अर्थाने देशाच्या विकासात हातभार लावू शकेल.

**संदर्भ ग्रंथ :**

- डॉ. विभुते भालबा, भारताचे संविधान, मनोविकास प्रकाशन, पुणे.
- डॉ.सरोज आगलावे, ज्योतिराव फुले, सामाजिक तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे.
- गुप्ता कमलेश कुमार, महिला सक्षमीकरण, बुक एंकलेव, जयपुर.
- आहूजा राम, भारतीय समाज व्यवस्था, रावत प्रकाशन जयपुर
- पाटील भारती, स्त्रियांचा सत्तेतील सहभाग सबलीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा, स्त्री अभ्यास केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
- दाभोळकर लता, राजकारणात तिचे पाऊल पुढे पुढे.

**वर्तमानपत्रे :**

- लोकसत्ता, लोकमत, नवभारत